N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** बुलढाणा  **P.S.(ठाणे):** नांदुरा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0404  **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/06/2024 18:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 23/01/2023
      **Time Period (कालावधी):** प्रहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/01/2023
      **Time From (वेळेपासून):** 15:59 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 16:21 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 29/06/2024  **Time (वेळ):** 18:30 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 031
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/06/2024 18:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पश्चिम, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय नांदुरा येथील , मागील बाजुस असलेल्या ,नांदुरा

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** अमोल गजानन सोनटक्के

**(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पुण्यानगरी वार्ड क्र2 नांदुर,नांदुरा ,नांदुरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पुण्यानगरी वार्ड क्र2 नांदुर,नांदुरा ,नांदुरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत शत्रुघ्न वाकोडे | | | 1. माळेगांव ,तक्ष शिला नगर, बुलडाणा रोड, नांदुरा ,नांदुरा , नांदुरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

लाच रकमेबाबत व आरोपी हे लोकसेवक आहे किंवा नाही याबाबत खात्री नसल्याने मा. पोलीस अधिक्षक सो लाप्रवि यांना जा.क्र. 375/2023 दिनांक 12.04.2023 अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यावरुन मा. पोलीस अधिक

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अमोल गजानन सोनटक्के, वय 31 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा. पुण्यनगरी वार्ड-2, नांदुरा, ता. नांदुरा जि. बुलढाणा मो. क्र. 9960461891

समक्ष फिर्याद देतो की, मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो व हेअर सलुनचे दुकान चालवितो. मी दिनांक 23.01.2022 रोजी पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांना फोनव्दारे माहीती दिली की, श्री. प्रशांत वाकोडे, संचालक बळीराजा ई सेवा केंद्र, नांदुरा हे मला जातप्रमाणपत्र काढण्याचा ऑनलाईन फॉर्म भरण्याकरिता 500/- रुपये लाचेची मागणी करित आहेत. अशी माहीती दिल्यावरुन श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी मला सांगीतले की, तुम्ही नांदुरा येथे थांबुन रहा आमचे अधिकारी आपणास संपर्क करुन पुढील कार्यवाही करतील. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी मला फोनद्वारे संपर्क करुन नांदुरा येथील मोताळा ते नांदुरा रोडवरील बायपासचे पुलाजवळ थांबून राहण्याचे सांगीतले. त्यांचे सांगणेप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो. अंदाजे 15:15 वा. सुमारास पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे हे सदर ठिकाणी आले. तेव्हा त्यांनी मला स्वतःचा परिचय करुन देवुन त्यांचे सोबत असलेले दोन शासकीय पंच क्र.1 मो. सरफराज अब्दुल गफार, वय 36 वर्ष पद वाहक, राज्य परीवहन महामंडळ बुलडाणा आगार, रा जुनागाव शेर ए अली चौक बुलढाणा व पंच क्र.2 श्री. शैलेंद्रसिंग रणजितसिंग राठोड, वय 37 वर्ष, पद- चालक, राज्य परीवहन महामंडळ बुलडाणा आगार रा. विश्वास नगर, माळविहीर, चिखली रोड, बुलडाणा यांचा व कारवाई पथकातील सदस्यांचा परीचय करुन दिला. तसेच माझा सुध्दा परिचय करुन दिला. त्यानंतर पोनि श्री. इंगळे यांनी मला सोबत आणलेल्या शासकीय वाहनात बसुन घेवुन माझी तक्रार घेतली. तसेच मी दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर पंचांची खात्री झाल्यावरुन पंच क्र.1 मो. सरफराज अब्दुल गफार यांनी मी दिलेल्या तक्रारीवर शेरा लिहुन त्यावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या. त्यानंतर पोनि श्री. इंगळे यांनी सांगीतले की, मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे श्री. प्रशांत वाकोडे, संचालक बळीराजा ई सेवा केंद्र, नांदुरा यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यात येणार असुन मी व पंच क्र.1 असे श्री. प्रशांत वाकोडे, संचालक बळीराजा ई सेवा केंद्र, नांदुरा यांची भेट घेवुन कामासंबधी बोलणी दरम्यान लाचेची मागणी स्पष्ट झाल्यास पुढील सापळा कार्यवाही आयोजीत करण्यात येईल असे सांगीतले. त्यानंतर पोनि श्री. इंगळे यांनी मला व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली तसेच पडताळणी कार्यवाही संबधाने सुचना दिल्या. त्याबाबत सविस्तर पडताळणीपुर्व पंचनामा तयार करण्यात आला. त्यानंतर मी, पोनि श्री. इंगळे यांना सांगीतले की, ई-सेवा केंद्र चालक श्री वाकोडे हे बळीराजा ई सेवा केंद्रावर असतील. तेव्हा पोनि श्री. इंगळे यांनी माझेजवळ व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन माझे गळ्यामध्ये शर्टचे आतमध्ये बाहेरुन दिसणार नाही अश्या पध्दतीने लटकवुन देवून पंच क्र.1 मो. सरफराज अब्दुल गफार यांचेसह माझे मोटार सायकलने श्री. वाकोडे यांची भेट घेण्याकरिता बळीराजा ई सेवा केंद्र नांदुरा येथे 15:59 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे तहसील कार्यालय नांदुराचे आवारात जावुन तहसील कार्यालयाचे इमारतीमध्ये मागील बाजुस असलेल्या एका खोलीमध्ये गेलो. सदर ठिकाणी श्री. प्रशांत वाकोडे यांची भेट घेतली. सदर भेटी दरम्यान मी, श्री. प्रशांत वाकोडे यांना म्हणालो, तुम्ही इकडं ये का प्रशांतभाऊ? मग इकडं तुम्ही परमनंन्ट ये की कॉन्ट्रक्ट बेस वर ये? त्यावेळी श्री. प्रशांत वाकोडे म्हणाले की, कॉन्ट्रक्ट बेसवर आहे. त्यानंतर मी त्यांचेशी माझे जात प्रमाणपत्राबाबत बोलणी करुन हाव त जरा सागा किती व्हते त कन्फर्म. त्यावर ई-सेवा केंद्र चालक श्री. प्रशांत वाकोडे म्हणाले की, मि तुले सागलं पाचशे व्हतात तशे., त्यावर मी म्हणालो की, आपण किती जवळचे हाये., त्यावर वाकोडे म्हणाले की, तु मग देजो न कमी देजो न., त्यावर मी म्हणालो की, किती देवु सांगा बरं., यावर वाकोडे म्हणाले की, तरीबी तिनकशे रूपये देवुन टाक. त्यावर मी म्हणालो की, पाहा बॉ आता याची फि त काय पाहा तुम्ही आता एवढं. यावर वाकोडे म्हणाले की, हे माहीत हाये मले. सदुसष्ट रूपयेच फि हाये त्याची. त्याले आणखीण दोन अॅफिडेव्हीट लावणं पडतात. आता सदया नविन मॅटर काय ये की अॅफिडेव्हीट लावणं पडतात रियालीस्ट म्हणुन. तिनशे रूपये खुप कमी सांगतले मी तुले तु जवळचा ये म्हणुन. त्यावर मी म्हणालो की,

मि देतो मग तुम्हाले थोड्या वेळानं पैशे आणून असे म्हणून सदर कक्षातुन बाहेर आलो. त्यानंतर मी पुन्हा श्री. वाकोडे बसलेल्या कक्षात गेलो व श्री वाकोडे यांना म्हणालो की, कन्फर्म सांगुन देलं त बरं हाये, कसं व्यवहारात व्यवहार क्लियर असो. तुमच्या हिशोबानी एक आकडा सांगा असं मले, त्यावर वाकोडे म्हणाले की, अरे तिनशे आता त्याच्यात पण तुले कमी दयायचे असन त देवुन देजो. काही प्रॉब्लेम नी ये, तुनं कधी शंभर बी देले त मी घेणारच ये. मि काय नाही म्हणणार ये? तुले जसं योग्य वाटीन तेव्हढे देजो. आता आणखीण काय बोलु ? तुले जेव्हढे योग्य वाटीन की बॉ असे म्हणुन प्रशांत वाकोडे यांनी त्यांचे ई-सेवा केंद्राचे ऑपरेटर श्री. गणेश यांना सांगीतले की, हे जेवढे देतील तेवढे ठेवुन घेजो, असे म्हणुन मला माझे जात प्रमाणपत्राचा ऑनलाईन फॉर्म भरुन देण्यासाठी सुरवातीस 500/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 300/- स्विकारण्याचे मान्य केले. परंतु लोकसेवक प्रशांत वाकोडे यांना पडताळणी दरम्यान माझ्यावर संशय आल्याने तसेच ई सेवा केंद्राचे संचालक हे लोकसेवक आहे किंवा नाही याबाबत मला तसेच सापळा पथकारा खात्री नसल्याने सापळा कार्यवाही आयोजीत न करता त्याबाबत खात्री करुन पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. आजरोजी मला पोनि श्री. इंगळे यांनी ई सेवा केंद्राचे संचालक हे लोकसेवक असल्याचे कळविले. तसेच सदर प्रकरणात पुढील कार्यवाही करणे असल्याचे सांगीतले. त्यावरुन मी पोनि श्री. इंगळे यांना सांगीतले की, सदर कार्यवाहीबाबत मी मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे तक्रार केलेली आहे. त्यामुळे प्रशांत वाकोडे यांना मी ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा येथे त्याची तक्रार केल्याचे माहीत असुन ते आजरोजी माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत. अशी माझी खात्री झाली असल्याचे सांगीतले. त्यावरुन पोनि श्री. इंगळे यांनी माझा सविस्तर जबाब नोंदविला. तरी ई सेवा केंद्राचे संचालक श्री. प्रशांत वाकोडे यांनी दिनांक 23.01.2023 रोजीचे 15:59 वा. ते 16:21 वा दरम्यान आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान तहसील कार्यालय नांदुरा येथील मागील बाजुस असलेल्या खोलीमध्ये माझे जात प्रमाणपत्राची ऑनलाईन फॉर्म भरुन देण्यासाठी सुरवातीस पंच क्र.1 यांचेसमक्ष 500/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 300/- स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आजरोजी ई सेवा केंद्राचे संचालक श्री. प्रशांत वाकोडे हे लोकसेवक असल्याची खात्री झाल्याने त्याचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. माझी फिर्याद सोबत आणलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करुन प्रिन्ट काढुन वाचुन पाहीली सांगीतल्याप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VILAS RAMESH PATIL(I (Inspector)) / POBN66039 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

अ. ग. सोनटक्के

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VILAS RAMESH PATIL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN66039